***The Research Analytics***
**(A Peer Reviewed and Open Access Journal)**

**28**

# स्वामी विवेकानंद युवकांचे प्रेरणास्त्रोत

प्रा. धनश्री भागवत सोनवणे
राज्यशास्त्र विभाग श्रीमती प. क. कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ.
Pages No: 207-212

***Abstract:***
*स्वामी विवेकानंद हे आधुनिक भारतातील महान तत्त्वज्ञ, विचारवंत आणि युवकांचे प्रेरणास्त्रोत म्हणून ओळखले जातात. त्यांच्या विचारांनी भारतीय समाजात आत्मविश्वास, आत्मशक्ती आणि राष्ट्रप्रेम यांची जागृती केली. विवेकानंदांनी युवकांना ध्येयवादी जीवन जगण्याचा संदेश दिला आणि व्यक्तिमत्त्व विकास, चारित्र्यनिर्मिती तसेच सामाजिक बांधिलकी यांवर भर दिला. त्यांच्या भाषणांमधून आणि लेखनातून युवकांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याची, अडचणींना धैर्याने सामोरे जाण्याची आणि समाजाच्या प्रगतीसाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळते. “उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका” हा त्यांचा संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत मार्गदर्शक आहे. त्यामुळे स्वामी विवेकानंदांचे विचार युवकांमध्ये सकारात्मकता, नेतृत्वगुण आणि राष्ट्रनिर्मितीची भावना जागृत करण्यास महत्त्वपूर्ण ठरतात.*

***Keywords:***
*स्वामी विवेकानंद, युवक प्रेरणा, व्यक्तिमत्त्व विकास, राष्ट्रनिर्मिती, आत्मविश्वास, चारित्र्यनिर्मिती.*

'हे नवयुवका, राष्ट्र बघ तुला सहाय्यार्थ बोलवी वाट निरामय आयुष्याची शोधायला हवी... तुझ्या जीवनी चैतन्यमयी पहाट येवो नवी वाट निरामय आयुष्याची शोधायला हवी ... [१]

प्रस्तावना भारतातील सर्वोत्तम अध्यात्मिक, प्रभावशाली तत्त्वज्ञ नेत्यांपैकी एक असलेले स्वामी विवेकानंद हे केवळ नाव नसून तो एक विचार आहे. स्वामी विवेकानंद हे युवकांसाठी ऊर्जा, आत्मविश्वास आणि ध्येयनिष्ठतेचे प्रतीक आहेत. ज्यांनी 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका' [२] यांसारख्या विचारांनी तरुणांना निस्वार्थ सेवा, चारित्र्य निर्मिती आणि आत्मशक्ती जागृत करण्यास प्रेरित केले, ज्यामुळे ते राष्ट्र उभारणीत आणि आधुनिक भारताच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरले. स्वामी विवेकानंदांना तरुणांमध्ये जागतिक बदल घडवून आणण्याची क्षमता दिसली. ते तरुणांना त्यांच्या सर्जनशीलतेद्वारे आणि उर्जेद्वारे समाज बदलण्यास सक्षम

मानत. स्वामी विवेकानंदांना वाटायचे की, तरुणाई राष्ट्राचा कणा आहे. त्यांच्यासाठी तरुणांना सक्षम आणि आत्मनिर्भर करणे म्हणजेच समाजाला चांगले बनवणे. कारण जोपर्यंत तरुण सक्षम आणि आत्मनिर्भर बनत नाही, तोपर्यंत चांगला समाज घडणे शक्य नाही. त्यांनी अशा भविष्याची कल्पना केली जिथे तरुण अध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांवर आधारित धैर्य, सचोटी आणि ज्ञानाने नेतृत्व करतील. स्पर्धेने भरलेल्या जगात यशाचा मार्ग अनेकदा अडथळ्यांनी भरलेला असतो. स्वामी विवेकानंद म्हणतात की, लक्ष केंद्रित करा आणि दृढनिश्चयी राहा. यश त्यालाच मिळते जो अडचणी असूनही पुढे जात राहतो. त्यांना माहीत होते की जीवन अनिश्चिततेने भरलेले आहे आणि जोखीम घेणे हे विकासाचे घटक आहे. त्यांनी तरुणांना आव्हाने स्वीकारण्यास आणि अपयशांना शिकण्याच्या संधी म्हणून पाहण्यास प्रोत्साहित केले. त्यांचा असा विश्वास होता की, व्यक्ती काम, दृढ निश्चय, आणि आत्मसंयम याद्वारे आपले भविष्य घडवू शकतात. स्वामी विवेकानंद यांचे विचार केवळ त्या काळातील तरुणांना प्रोत्साहीत करणारे नसून ते आजच्या काळातही तरुणांना प्रेरक ठरतात.

उद्दिष्टे :-

१) स्वामी विवेकानंदांचे तरुणांविषयीचे विचार जाणून घेणे.

२) राष्ट्र उभारणीत आणि आधुनिक भारताच्या विकासात स्वामी विवेकानंदांची भूमिका समजून घेणे.

गृहितक :-

स्वामी विवेकानंदांचे विचार आजही नवयुवकांना प्रेरक आणि मार्गदर्शक ठरतात.

संशोधन पद्धती प्रस्तुत संशोधन निबंधात दुय्यम स्रोतांचा वापर केला आहे. तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी विषयासंदर्भातील विविध संदर्भ ग्रंथ, संशोधने, प्रकाशित साहित्य, याचा उपयोग करण्यात आला आहे व त्या अनुषंगाने निष्कर्षांची मांडणी करण्यात आली आहे. विषय विवेचन १९८५ पासून दरवर्षी भारत सरकार १२ जानेवारी हा स्वामी विवेकानंदांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करते. जो या महान देशभक्त आणि भारताच्या सुपुत्राचा शाश्वत संदेश पुन्हा जागृत करण्यासाठी केला जातो. कारण स्वामीजींचे तत्त्वज्ञान आणि त्यांनी केलेले आदर्श जीवनकार्य हे भारतीय युवकांसाठी आजही प्रेरणास्थान ठरते. भारत हा जगातील सर्वात तरुण राष्ट्रांपैकी एक आहे. जिथे सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ही तरुण वर्गाची आहे. कोणत्याही देशातील लोकसंख्येतील तरुण हा खरोखरच सर्वात गतिमान आणि उत्साही घटक असतो. स्वामी विवेकानंदांना तरुणांमध्ये जागतिक बदल घडवून आणण्याची क्षमता आहे असा ठाम विश्वास होता.

तरी न कधी कोमेजावी मनातली पालवी
वाट निरामय आयुष्याची शोधायला हवी...
देही असावी बलसंपत्ती. [३]

आपण सुरुवात कुठून करणार याचे उत्तर आपल्याला स्वामी विवेकानंदांनी तयार ठेवले आहे. आपल्याला गौरवशाली भारत घडवायचा आहे. यासाठी निःस्वार्थी नेत्यांच्या आदर्श यांचे पालन करणे हे आपले कर्तव्य आहे. उज्वल भविष्याच्या निर्माणासाठी वर्तमानत भूतकाळाचा अभ्यास करणे महत्त्वाचे असते. बलवान राष्ट्राच्या उभारणीसाठी ते आवश्यक असते. आजची युवा पिढी ही चंगळवादाच्या जाळ्यात अडकत चालली आहे याला कारण अस्मिततेची विस्मृती झालेला समाज! स्वामीजी आपल्या उपदेशात म्हणतात-'धैर्याने, शौर्याने पुढे चला, एखाद्या दिवसात व एखाद्या वर्षातच यश आपल्या पदरी पडेल अशी अपेक्षा बाळगू नका. मतस्त्र आणि स्वार्थपरायणता या दोन्ही गोष्टी टाळा. यांच्याविषयी सर्वदा प्रामाणिक रहा म्हणजे अगदी जग हलवून सोडल. लक्षात ठेवा की, स्वतःचे व्यक्तिमत्व, स्वतःचे जीवन हेच शक्तीचे रहस्य आहे अन्य काही नाही. [४]

स्वामीजींनी एका शिष्याला भगवद्गीता वाचण्यापेक्षा बाहेर जाऊन फुटबॉल खेळ असा सल्ला दिला होता, त्याची आठवण होते. याबाबत स्वामीजी म्हणाले होते 'बलवान व निरोगी शरीरात सशक्त मन नांदते, अशक्त शरीरात तसे होणे संभव नाही. [५] आजची पिढी फुटबॉल, हॉकी, क्रिकेट आदी खेळ खेळून दमते. हे खेळ फक्त ती संगणकावरच खेळते आणि थकून जाते याला काय म्हणावे? स्वामीजी म्हणतात- अनुकरण म्हणजे सभ्यता नव्हे भिऊन केलेल्या अनुकरणाने कधीच प्रगती होणार नाही. (६) आपल्या पद्धतीने कोणतीही गोष्ट ग्रहण करून आत्मसात करावी. आपले स्वातंत्र्य गमावून आपण दुसऱ्याप्रमाणे होऊ नये. भारतीय जीवनपद्धतीच्या बाहेर जाऊ नका त्यावेळच्या शिक्षणाबद्दल स्वामीजी जे विचार मांडतात ते आजही लागू असल्याचे दिसते. ते एकदा म्हणाले होते जे शिक्षण सामान्य जनतेला जीवनाच्या संघर्षासाठी स्वतःला सज्ज करण्यास मदत करत नाही, जे चारित्र्याची ताकद, परोपकाराची भावना आणि सिंहाचे धैर्य निर्माण करत नाही ते नाव देण्यासारखे आहे का? खरे शिक्षण ते आहे जे एखाद्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सक्षम करते. [७] भारतीय समाजाची पुनर्बाधणी करण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी सुचविलेल्या विविध मार्गापैकी शिक्षण हे लोकांना सक्षम बनविण्याचे प्राथमिक साधन होते. त्यांच्यासाठी शिक्षणाचा अर्थ धर्मनिरपेक्ष शिक्षण होता, जे चारित्र्य निर्माण करते आणि विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्य रुजवते.

स्वामीजी सांगतात स्थिर बुद्धीचे व्हा व सर्वात महत्त्वाचे म्हणजे पवित्र व्हा व स्वतःशी पूर्णपणे प्रामाणिक रहा. आपल्या भवितव्यावर श्रद्धा ठेवा, स्वतःच स्वतःचे भविष्य घडवा. 'गतं ना शोच्यम' जे झाले ते होऊन गेले त्याबद्दल खंत करीत बसू नका. म्हणतात ना की वाहिले ते पाणी राहिली ती गंगा [८] अनंत भावी काळ तुमच्यापुढे विस्तारलेला आहे आणि हे तुम्ही नेहमी लक्षात ठेवावयास हवे की तुमचा प्रत्येक शब्द, प्रत्येक विचार, नि प्रत्येक कृत्य तुमच्या गंगाजळीत संचित राहील. आणि हे पण सदा लक्षात असू द्या की, तुम्ही केलेले कुविचार आणि तुम्ही केलेली कुकर्मे ज्याप्रमाणे वाघासारखी तुमच्यावर झेप घेण्यास टपून आहेत, त्याचप्रमाणे

ही देखील मोठ्या स्फूर्तीदायी आशेची गोष्ट आहे की तुमचे सद्‌विचार आणि तुमची सत्कर्म हजारो लाखो देवदूतांच्या शक्तीने तुमचे रक्षण करण्यास सदा सर्वदा सज्ज आहेत. एकदा एखादी कल्पना स्वीकारली की मग तिलाच आपले जीवन सर्वस्व बनवाः सतत तिचाच ध्यास घ्या. इतर कोणत्याही विचारांना थारा देऊ नका यशस्वी होण्याचा हाच मार्ग आहे.

स्वामी विवेकानंद एकदा म्हणाले होते- 'तुम्ही जे काही विचार करता तेच तुम्ही व्हाल. जर तुम्ही स्वतःला कमकुवत समजलात तर तुम्ही कमकुवत व्हाल, जर तुम्ही स्वतःला बलवान समजलात तर तुम्ही बलवान व्हाल (९) सर्वोच्चतेकडे पहा त्या सर्वोच्चतेकडे लक्ष ठेवा आणि तुम्ही सर्वोच्चेतेपर्यंत पोहोचाल [१०] त्यांचा संदेश साधा पण शक्तिशाली होता विवेकानंदांनी त्यांचे विचार थेट लोकांपर्यंत पोहोचवले, विशेषतः तरुणांपर्यंत. त्यांचा संदेश जात आणि पंथांच्या बंधनांना तोडून वैश्विक बंदुत्वाची भाषा बोलला त्यांनी जे सांगितले ते आज आपल्या देशातील तरुणांमध्ये त्यांच्या विचारांचे आणि आदर्शाचे मोठे महत्त्व प्रतिबिंबित करते. त्यांनी तरुणांच्या शाश्वत ऊर्जेचे आणि सत्याच्या त्यांच्या अथक शोधाचे मूर्तिमंत रूप धारण केले.

पण या आव्हानात्मक आणि रोमांचक काळात जेव्हा एकीकडे लोक आणि राष्ट्र विविध राष्ट्र उभारणीच्या कार्यात तरुणांना सहभागी करून त्यांचे व्यक्तिमत्व आणि नेतृत्व गुण विकसित करण्याचे उदात्त कार्य करीत आहेत, तर दुसरीकडे भूक, गरिबी, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि दहशतवादाची आव्हाने आहेत. तेव्हा तरुणांना स्वामी विवेकानंदांची प्रसंगीता कशी जाणवून द्यावी? स्वामी विवेकानंदांनी तरुणांना राष्ट्राचा कणा म्हटले आहे. त्यांच्या मते, समाजाला चांगले बनवायचे असेल तर तरुणांना सक्षम करणे आवश्यक आहे. त्यांच्या शिकवणी तरुणांना स्वतःसाठी सामाजिक उन्नतीसाठी आणि उच्च ध्येयांसाठी काम करण्यास प्रेरित करतात. ज्या क्षणी समकालीन जीवनाचे दबाव, चिंता, स्पर्धा आणि आत्मशंका तरुण पिढीवर वारंवार येतात त्याक्षणी स्वामी विवेकानंद स्पष्टता, प्रेरणा आणि मार्गदर्शन प्रदान करतात. अशा परिस्थितीत ते म्हणतात ध्येय निश्चित करा आणि ती साध्य करण्यासाठी कृतीशील योजना विकसित करा. भीतीपेक्षा अपयशातून शिका आणि लवचिकता निर्माण करा. विचलित होण्यापासून दूर राहा आणि तुमच्या ध्येयावर ठाम रहा. अनेक तरुणांना त्यांच्या आरामदायिक क्षेत्राबाहेर पाऊल टाकण्याचा प्रयत्न केल्यास अपयशाची भीती वाटते. नावीन्य आणि अनुकूलतेची आवश्यकता असलेल्या जलद बदलाच्या युगात स्वामी विवेकानंदांचे विचार तरुणांना संधी मिळवण्यासाठी विचारपूर्वक जोखीम घेण्यास प्रोत्साहित करतात.

आजच्या या सोशल नेटवर्किंगच्या काळात समवयस्कांचा दबाव असेल किंवा बाह्य प्रभाव असेल या गोष्टी अनेकदा जीवनातील निर्णयांवर प्रभाव पाडतात. तेव्हा तरुणांनी दबाव आणि प्रभाव यांच्यामध्ये न गुंततात जीवनात स्वतःचे मार्ग स्वतः बनवले पाहिजे. समाजाच्या अपेक्षांनुसार निर्णय घेण्याऐवजी तुमच्या मूल्यांबद्दल आणि आकांक्षांबद्दल निर्णय घ्या. स्वतः तुमच्या कृती

आणि परिणामांची जबाबदारी स्वीकारा. तसेच तुमची ध्येय साध्य करण्यासाठी कामाची नीतिमत्ता निर्माण करा. स्वामी विवेकानंदांनी तरुणांना धाडसी आणि दृढनिश्चयी राहण्याचा आणि शंका घेऊ नका, घाबरू नका असा सल्ला दिला. आजच्या वेगवान जगात तरुणांमध्ये चिंता आणि आत्मशंका यांसारख्या मानसिक आरोग्य समस्या मोठ्या प्रमाणात आढळतात, स्वामी विवेकानंदांचे विचार जीवनातील या चढ-उतारांना तोंड देण्यासाठी आंतरिक शक्ती विकसित करण्याचे सुचवते. तसेच तरुणांना स्वतःवर विश्वास ठेवण्यास आणि निर्भयपणे त्यांच्या स्वप्नांचा पाठलाग करण्यास प्रोत्साहित करते.

'सर्व शक्ती तुमच्या आत आहे, तुम्ही काहीही आणि सर्वकाही करू शकता [११] स्वामी विवेकानंद प्रत्येक व्यक्तीच्या क्षमतेवर विश्वास ठेवतात हे सशक्त करणारे विधान आहे. तंत्रज्ञानाची उपलब्धता, प्रशिक्षण आणि माहिती यामुळे आजच्या तरुणांना बदल घडवण्याच्या अधिक संधी उपलब्ध झाले आहेत. हे वाक्य त्यांना आठवण करून देते की त्यांच्या क्षमता उघड करण्याची गुरुकिल्ली त्यांच्या आत आहे. त्यांनी तरुणांना त्यांच्यातील आंतरिक शक्ती ओळखून तिचा वापर महान होण्यासाठी करायला सांगितले. महत्त्वकांक्षी ध्येय निश्चित करा आणि ती ध्येय पूर्ण करण्यासाठी काम करा. शिकून आणि स्वतःचे विचार विकसित करून वाढीची मानसिकता विकसित करा. तुमच्यातील ज्या काही प्रतिभा आणि क्षमता असतील त्या समाजाच्या विकासासाठी वापरा. स्वामी विवेकानंद युवकांना सामान्यतेच्या पलीकडे जाऊन त्यांच्या क्षमतेचा वापर करण्यासाठी आणि उद्देशपूर्णपणे जगण्यासाठी कृती करण्याचे आवाहन आहेत.

निष्कर्ष :-

1) स्वामी विवेकानंद यांचे जीवन आणि विचार हे आजच्या युवकांसाठी आदर्श आहेत.

२) त्यांचे कार्य तरुणांना केवळ ज्ञान मिळविण्यासाठीच नव्हे तर चारित्र्यवान, सामर्थ्यवान, सेवाभावी आणि ३) ज्यामुळे ते देशाच्या प्रगतीत सक्रिय योगदान देऊ शकतात त्यांचा प्रत्येक विचार युवकांना एक नवी दिशा

कर्तव्यदक्ष बनवण्यासाठी मार्गदर्शन करते.

देतो आणि त्यांना महान कार्यासाठी प्रेरित करतो.

४) त्यांचे कालातीत ज्ञान हे तरुणांना निर्भय, लवचिक, दयाळू बनण्यासाठी एक दीपस्तंभ आहे.

५) आजच्या वेगवान, तंत्रज्ञानाने भरलेल्या जगात स्वामी विवेकानंदांच्या शिकवणी कधीच प्रासंगिक होत

नाहीत. ते समकालीन आव्हानांसाठी आवश्यक असलेल्या लवचिकता, आत्मविश्वास आणि मानवतेची सेवा यांसारख्या सार्वत्रिक विषयांवर काम करतात.

६) वैयक्तिक उत्कृष्टतेचा पाठलाग करत असो किंवा जागतिक बदल घडवत असो तरुणांना त्यांच्या शिकवणीतून नेहमीच प्रेरणा मिळू शकते.

संदर्भसूची :-

१) स्वामी ब्रह्मस्थानंद स्वामी विवेकानंद ग्रंथावली संचयन रामकृष्ण मठ (२००८)
२) स्वामी शिवतत्वानंद स्वामी विवेकानंद यांचे चरित्र रामकृष्ण मठ (२००९)